ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 5 | February - 2019
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED
Journal No.: 48514

# साहित्य आणि संस्कृती





प्रा.प्रशांत चौधरी

**प्रा.प्रशांत चौधरी**
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद.

प्रस्तावना : मनुष्यप्राण्याचे 'मनुष्यत्व' अधोरेखित करणाऱ्या ज्या मोजक्या प्रमुख गोष्टी आहेत, त्यात ललितकलांचा उल्लेख अग्रस्थानी करावा लागले. एक सजीव म्हणून अन्य प्राण्यांप्रमाणे मनुष्यालाही निसर्गसुलभ अशा ..........

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi




ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol.- 8, Issue - 5,February -2019

## Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | Social And Economic Condition Of Dalits In The Literary Works Of Annabhau Sathe<br>Dr. Sanjay S. Tamgadge | 1 |
| 2 | Relationship of Physical Disease and Mental Disorders with Drug Use in Yasouj City (Iran)<br>Seyed Soleiman Hosseininik , seyed Yousof Rasouli , Seyed Mohammad Hosseininik | 4 |
| 3 | साहित्य आणि संस्कृती<br>प्रा.प्रशांत चौधरी | 12 |
| 4 | Check List of Avifauna of Khudus Vanaushadi and Nakshatravan of Forest Department of Malshiras Tahasil Dist: Solapur [Maharashtra]<br>Mayuri Vagare, Anisha Shingade, Rutuja Deshmukh, Pratap Jadhav and Arvind Kumbhar | 16 |
| 5 | Exploring The Impact of Income on Facets of Job Satisfaction of Women Employees in Public Banks of Sonepat of Haryana<br>Dr. Budheshwar Prasad Singhraul and Yogita Satish Garwal | 22 |
| 6 | Emancipation of Human Being with Reference to The Poem Entitled Freedom by Jayanta Mahapatra<br>Balasaheb G.Yadav | 30 |
| 7 | ಹೈದ್ರಾಬಾದ ಕರ್ನಾಟಕದ ಪ್ರಾದೇಶಿಕ ಕಾದಂಬರಿಗಳ ಆರ್ಥಿಕ ವ್ಯವಸ್ಥೆ<br>Dr. Bheemanna H. | 34 |

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# साहित्य आणि संस्कृती

**प्रा.प्रशांत चौधरी**
**व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद.**




मनुष्यप्राण्याचे 'मनुष्यत्व' अधोरेखित करणाऱ्या ज्या मोजक्या प्रमुख गोष्टी आहेत, त्यात ललितकलांचा उल्लेख अग्रस्थानी करावा लागले. एक सजीव म्हणून अन्य प्राण्यांप्रमाणे मनुष्यालाही निसर्गसुलभ अशा विकार—वासना आहेत. तथापि, आपल्या अद्भूत बुध्दिवैभवाच्या अन् सुरम्य कल्पनाचातुर्याच्या जोरावर मनुष्याने निर्माण केलेले हे सर्वथा नाविण्यापूर्ण असे अद्वितीय विश्व पाहता अन्य प्राणीमात्रांहून मनुष्याचे श्रेष्ठत्व सहज सिध्द होते.

निसर्गाने प्रदान केलेले जीवन जसेच्या तसे व्यतीत करणे हा प्राण्याचां विशेष; तर निसर्गाशी संवादी राहत समांतर अशी विहंगम सृष्टी निर्माण करणे, हे मनुष्याचे कर्तृत्व! म्हणनूच प्राणी प्राकृतिक स्तरातले तर मनुष्य सांस्कृतिक स्तरातले जीवन जगत असलेला दिसतो. मानवतेर प्राण्यांच्या शारीरिक वृध्दीचे आणि मानसिक—बौध्दिक विकासाचे प्रमाण पाहता, मनुष्याचा वृध्दिदर दोन्ही बाबतीत मानेवतर प्राण्यापेक्षा अधिक राहिललो दिसतो. तसेच, निसर्गाने प्रदान केलेल्या काही विशिष्ट सक्षमतांमुळेही मानव प्राणीसृष्टीत सदैव अग्रेसर राहिलेला आहे. या क्षमतांच्या आधारे भौतिक, आधिभैतिक व आध्यात्मिक विश्वाची निर्मिती मनुष्य करू शकला. यालाच 'संस्कृती', 'सभ्यता' अशी संबोधने वापरली गेली आहेत.

'सांस्कृतिकता' या एका वैशिष्ट्याने मानवी जीवनाला अर्थपूर्णता प्राप्त करून दिली आहे. ही संस्कृती ज्या विविध घटकांनी सिध्द होते त्यांत साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प आदि विविध ललित कलांचे मोठे योगदान असलेले दिसते. मनुष्याने आपल्या बौध्दिक क्षमतांचा पुरेपूर वापर करत वैज्ञानिक शोधांच्या आधारे जीवनाला जशी भौतिक समृध्दी प्राप्त करून दिली, तसेच आपल्या कलात्मक जीवनदृष्टीचे विविधांगी प्रदर्शन करीत, हेच जीवन रमणीयही केले. सामान्य विज्ञान, समाजविज्ञान आणि मानव्य विद्याशाखांमधील सर्वस्पर्शी सृजनशीलतेचा मनोहारी आविष्कार म्हणजेच मानवी सभ्यतेची वाटचाल होय. त्यातही शब्दार्थमय ललित साहित्याचे स्थान महत्वपूर्ण असेच राहिले आहे.

मराठी साहित्याच्या संदभार्त बोलायचे झाल्यास मध्ययुगातील श्री चक्रधर ते तुकाराम—रामदास यांच्यापर्यंतच्या संत साहित्यातून आणि तद्नंतरच्या अर्वाचिन साहित्यातूनही जी जीवनमूल्ये निर्माण झाली त्यातून संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्यच घडून आले असे दिसते.

कृ — करणे या धातूपासून 'कृति' हा शब्द बनतो. त्यास 'प्र', 'वि' आणि 'सम्' हे उपसर्ग लावल्यास अनुक्रमे प्रकृती, विकृती आणि संस्कृती असे शब्द बनतात. प्रकृती म्हणजे निसर्ग. विकृती म्हणजे त्यांत होणारा बिघाड आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने तिच्यावर केलेले विविध सम्यक संस्कार होत.

मानव हा सभोवतीच्या निसर्गात किंवा निसर्गातल्या पदार्थात आपल्या जीवनाला अनुकूल आणि उपयुक्त असे बदल करून किंवा प्रसंगी त्यांच्यावर इष्ट असे संस्कार करून आपली जिवितयात्रा चालवित

असतो. या प्रक्रियेतूनच संस्कृती उदयास येत असते. ''मनुष्यसमाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी; पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय'' ही इरावती कर्वे यांनी संस्कृतीची केलेली व्याख्या अभ्यासनीय अशी आहे. 'साहित्याचे सांस्कृतिक संचित', या ग्रंथात 'संस्कृती' या संकल्पनेचे स्पष्टीकरण विविध पाश्चात्य व भारतीय विचारवंतांच्या व्याख्या देत संपादकानी केले आहे. यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) सर एडवर्ड टायलर बी. : "culture is that complex whole which includes knowledge, belief, art, morals, law, custom and any other capabilities and habits acquired by man as a member of society." अर्थात व्यक्तीने समाजाचा घटक म्हणून संपादित ज्ञान, श्रध्दा, नीति, कायदा, रूढी या आणि अशाच पात्रता आदींचा समावेश या व्यामिश्र समग्रतेत होतो. या संपूर्ण बाबींना संस्कृती म्हणता येईल.

२)जोसेफ पीपर : "Culture is the quintessence of all natural goods of the world, and of those gifts and qualities which, while belonging to man, Lie beyond the immediate sphere of his needs and wants" अर्थात् मानवासाठी निसर्गाने प्रदत्त केलेल्या वस्तू आणि प्रदत्त देणगीचे सार मात्र मानवी गरजाच्या पलीकडे असते, ती संस्कृती.

३) डॉ. आ.ह. साळुंखे : ''सम्यक कृती म्हणजे संस्कृती''

४) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोषी : '' मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपध्दती निर्माण करतो आणि जीवनसाफल्याचे स्वतःवर आणि बाह्यविश्वावर संस्कार करून आविष्कार करतो, ती पध्दती वा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय. मनुष्य व भोवतालचे विश्व मिळून निसर्ग होतो. या निसर्गामध्ये बदल करून किंवा संस्कार करून मनुष्याची जीवितयात्रा चालत असते. निसर्गावर विजय मिळविण्याचा क्रम म्हणजे संस्कृती होय.''

वरील व्याख्यांमधून संस्कृतीच्या स्वरूपावर प्रकाश पडतो आणि या संकल्पनेची वैशिष्ट्येही अधोरेखीत होतात. तसेच संस्कृतीकडे पाहण्याच्या भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोनाचे निराळेपणही सूचीत होते. पाश्चिमात्य संस्कृतीत तर्क, प्रज्ञा, स्पर्धा व विज्ञाननिष्ठा यांच्या आधारे जडवादाला जवळ जाणारी दृष्टी दिसते; तर संस्कृतीच्या भारतीय दृष्टिकोनात प्रकृतिपूजा, आध्यात्मिकता आणि संघर्षापेक्षा सहयोगाचे दर्शन घडते. डॉ. रमेश वरखेडे यांचे या संदर्भातील विवेचन अधिक यथार्थ आहे. ते म्हणतात, ''द्वंद्वमूल एकता साधणे ही भारतीयांची प्रवृत्ती आहे. शिव आणि शक्ती, ब्रह्मा आणि प्रकृती, देह आणि आत्मा, स्थिती आणि गती यांच्यातल्या अंतःसंचारी संबंधातून हे घडते, द्वंद्वाला विसर्जित करून द्वंद्व मूल एकता प्रस्थापित करते. ही अनुभव घेण्याची व आविष्कृत करण्याची रीत खास भारतीय आहे. संघर्षाची परिणती शांततेत करणारी अहिंसामूलक ओढ हा भारतीय स्वभाव आहे.''[२]

सांस्कृतिक परम्परा या प्रत्येक समाजाचा राष्ट्रीय व ऐतिहासिक ठेवा असतात. एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अशा क्रमाने संस्कृतीचे हस्तांतरण होत असते. प्रत्येक पिढी ही जुन्या पिढीकडून प्राप्त झालेल्या सांस्कृतिक संचिताची संवाहक असते. चांगले—वाईट, सत्य—असत्य, नैतिक—अनैतिक अशा संकल्पनांचे व्यूह सांस्कृतिक मूल्यांची निर्मिती करतात आणि या मुल्यांच्या आधारे त्या—त्या समाजाच्या जीवनाव्यापाराचे नियमन हाते असते.

मराठी साहित्याच्या संदर्भात बोलायचे झाल्यास असे म्हणता येईल की, मध्ययुगात श्री चक्रधरांपासून सुरू झालेली मराठी संतांची सांस्कृतिक चळवळ ज्ञानदेव — नामदेव — एकनाथ — तुकाराम — रामदास यांच्या पर्यंत येऊन पोहचते. या संत परंपरेने निर्माण केलेले वाङ्मय मराठी संस्कृतीचे मूल्यात्मक संवर्धन करणारे ठरले, ही बाब स्वयंस्पष्ट आहे.

संस्कृती आणि साहित्य यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणजे भाषा होय. व्यक्तीची जडण—घडण कोणत्या संस्कृतीत झालेली आहे, हे प्रथमतः त्याच्या भाषेवरूनच स्पष्ट होते. संस्कृती संदर्भात भाषेचा विचार करता ती केवळ व्यक्त होण्याचे माध्यम न राहता ती त्या व्यक्तीचे स्थल, काल आणि समाजातील स्थितीची प्रवक्ता म्हणून कार्य करते. आणि म्हणूनच भाषेचा व संस्कृतीचा विचार समाजसापेक्ष पध्दतीनेच करणे श्रेयस्कर ठरू शकते. या संदर्भात भा.ल. भोळे 'विसाव्या शतकातील मराठी गद्य—खंड २' या

ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'भाषा समाजनिर्मित असते आणि तिचा विकास समाजच करतो. 'भाषेचा विकास आणि समाजाचा विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाज भाषेला समृध्द करतो आणि समृध्द भाषा समाजाला समृध्द करते. त्यामुळे भाषा टिकायची असेल आणि विकसित करायची असेल तर तिला समाजाच्या व्यापक विकासप्रक्रियेशी जोडणे आवश्यक असते'. इमारतीच्या बांधकामात जे महत्व पायाचे असते ते समाज बांधणीच्या कामी भाषेला असते, हे कार्ल मार्क्सचे विधान स्वयंसिद्ध आहे.'[३]

संस्कृतीचा संबंध व्यक्ती, समाज व राष्ट्राच्या नैतिक जडणघडणीशी निगडीत असतो. याबाबत प्रख्यात विचारवंत शंकरराव देव यांचे पुढील प्रतिपादन मार्गदर्शक आहे. ते म्हणतात, 'माणसाला भौतिक संपत्तीची जितकी जरूर आहे तितकीच नैतिक व आध्यात्मिक संपत्तीची आहे. म्हणून भौतिक संपत्तीच्या वाढींत या दुसऱ्या संपत्तीचा नाश होणार नाही अशी माणसाने खबरदारी घेतली पाहिजे. त्यासाठी माणूस हा तत्वत: नैतिक व आध्यात्मिक प्राणी आहे, हें मान्य करून माणसामाणसांतील व राष्ट्राराष्ट्रांतील संबंध नैतिक व आध्यात्मिक पायावरच बांधले पाहिजेत.'[४] श्री देव यांना अभिप्रेत असणारे नीतिसंर्धनाचे वरील कार्य तत्वज्ञानासोबतच ललित साहित्यामधूनही प्रभावीप्रणे होऊ शकेल, असे मला वाटते.

साहित्याचा निर्माता असणारा लेखक आपल्या कलाकृतीच्या निर्मितीसाठी आशयद्रव्याचे संकलन याच सांस्कृतिक पर्यावरणात राहून करत असतो. लेखकाने निर्मिलेली कलाकृती ही जरी त्याच्या प्रतिभा शक्तीची किमया असली तरी ज्या सामाजिक—सांस्कृतिक परिसरात तो (लेखक) वावरत असतो, त्या परिसराचा संस्कार त्याच्या निर्मितीवर होत असतोच.

कलेविषयीची ओढ ही मानवाची प्रवृत्ती मानली जाते. परंतु, तिला अर्थवत्ता प्राप्त होते, ती संपूर्ण सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या संदर्भातच. आपल्या सौंदर्यजाणिवांवर संस्कृतीची पूर्ण पकड असते. आपला विचार—मानस—कोश पूर्णपणे संस्कृतीच्या घटकांनी युक्त असा असतो. चांगले किंवा वाईट; सुंदर किंवा कुरूप हे ठरविण्याचे कार्यही हा कोशच करत असतो.

हा सांस्कृतिक कोश किंवा पर्यावरण आणि साहित्य यांचा निकटचा संबंध आहे. सभोवतालच्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाशी सर्जनशील कलावंताचे जैविक नाते असते आणि त्यामुळे या पर्यावरणातील परिवर्तनाचे पडसाद त्याच्या आविष्कृतीमधून उमटणे क्रमप्राप्त असते. जर ते असे उमटले नाहीत, तर ती एक विकृती मानून तिच्या कार्यकारणांचा शोध घेण आवश्यक ठरते. परिवर्तनशील समाजातील प्रत्येक समुहाला त्या परिवर्तनाच्या संदर्भात अन्य समुहांशी आणि एकंदर समाजाशीच असलेल्या आपल्या संबंधांचा फेरविचार करावा लागतो; आणि बदलत्या परिस्थितीच्या अनुषंगाने आपला दृष्टीकोन, विचारप्रणाली व ध्येयधोरण बदलावे लागते.

तथापि, आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही ज्या प्रमाणात समाजाच्या बदलत्या स्थितिगतीच्या जाणिवा साहित्यात यायला हव्यात; त्या येत असलेल्या दिसत नाहीत. आजही रंजनप्रधान साहित्याची होणारी प्रचंड निर्मिती आमच्या सांस्कृतिक साचलेपणाची निदर्शक आहे. बदलत्या जीवनजाणिवांसोबतच राष्ट्रावर येणाऱ्या, येवू घातलेल्या वा आलेल्या संकटांची जाणीवही आजच्या साहित्य विश्वात अभावानेच आढळत असलेली दिसते. दुभंगलेली राज्यव्यवस्था, चिरफाळलेले, जखमी व भ्रष्टाचारी राजकीय वातावरण साहित्यातून स्फोट होऊन अवतरतांना दिसत नाही. आपला विचारकोश संकुचित व मर्यादित होत चालला आहे, याचेच हे निदर्शक आहे. यास्तव आजच्या सारस्वतकारांना तसेच रसिकजनांनाही एका नव्या परिवर्तनशील नीतिमत्तेची आवश्यकता आहे, हे समजून घेऊन आपल्या विचारकोशाची नव्याने घडण होण्याची प्रक्रिया सुरू होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :—**

१) साहित्य आणि संस्कृती यांचे नाते परस्पर पूरक आहे.

२) साहित्य हा संस्कृतीचाच एक अविभाज्य घटक असून सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडविणे हा साहित्याचा एक हेतू आहे.

३) मराठी साहित्याच्या वाटचालीचा आढावा घेतल्यास मध्ययुगीन संतांच्या साहित्यापासून ते आधुनिक साहित्यिकांपर्यंतच्या वाटचालीतून असे आढळून येते की, विविध साहित्य प्रवाहांनी सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन व दिग्दर्शन प्रभावीपणे केले आहे.
४) संस्कृतीच्या बदलत्या रूपांचे दर्शन वाङ्मयीन प्रवाहांचे अवलोकन करताना होते.

**संदर्भ सूची :—**

१) लुलेकर प्रल्हाद व डॉ. तुपे केशव, संपा. साहित्याचे सांस्कृतिक संचित, औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन, आवृत्ती पहिली, नोव्हे. २००५, पृ. १२, १३, १४.
२) वरखेडे रमेश, साहित्यविमर्श, औरंगाबाद, साकेत प्रकाशन प्रा.लि., प्रकाशन क्र. १६३४, आवृत्ती पहिली, २०१४, पृ.१२
३) भोळे भास्कर लक्ष्मण, ''प्रस्तावना'', विसाव्या शतकातील मराठी गद्य खंड २, संपा. भोळे भा.ल., नवी दिल्ली, साहित्य अकादेमी, पहिली आवृत्ती २०१०, पृ. XXVII
४) देव शंकर, ''समाजवादी लोकशाहीची साधना'', विसाव्या शतकातील मराठी गद्य खंड २, संपा. भोळे भा.ल., नवी दिल्ली, साहित्य अकादेमी, पहिली आवृत्ती २०१०, पृ. १४